# २२ प्रेम ( Love )

एक आटपाट नगर होते . त्या नगरात एक श्रीमंत माणूस रहात असे . खुप मोठा व्यवसाय होता , नोकर चाकर होते , संपत्ति होती . त्यांना एक मुलगा असतो . तो मोठा होतो , शिकतो व व्यवसायात वडिलांना मदत करायला लागतो . कालांतराने त्याचे लग्न होते .

एक दिवस संध्याकाळच्या वेळेला तीन म्हातारे त्याच्या बंगल्यात येतात . बायको त्यांना घरात बोलावते . म्हातारे सांगतात की घरचा कर्ता पुरूष घरात आहे का ? असेल तरच आम्ही येतो . बायको सांगते की थोडया वेळानी माझे पती व मुलगा येतील . म्हातारे म्हणतात की तोपर्यंत आम्ही बाहेरच थांबतो .

थोडयावेळाने तो श्रीमंत माणूस घरी येतो व बायकोला म्हाता–यांबद्दल विचारतो . बायको म्हाता–यांना बोलावयला जाते . म्हातारे सांगतात की आमच्यापैकी कोणी आत यावे हे विचारा . आमची नावे यश , संपत्ति व प्रेम आहेत . बायको आत जाते . तो श्रीमंत माणूस म्हणतो की आपण संपत्तिला बोलाविले पाहिजे . बायको म्हणते की आपण यशाला घरात घेऊ . त्यांचे काही एकमत होत नाही . तेव्हढयात त्यांची सून येते . तो श्रीमंत माणूस सूनेला विचारतो . सून सांगते की आपण प्रेम नावाच्या म्हाता–याला बोलावू . सर्वांचे एकमत होते .

ती बाई परत म्हाता–यांना बोलावयला जाते . आपल्यापैकी प्रेम कोण आहे ? माझे पति त्यांना भेटू इच्छितात . हे ऐकल्यावर तीनही म्हातारे घरात घुसतात . तो श्रीमंत माणूस , त्याची बायको चक्रावतात . परंतु सूनेला फारसे आश्र्चर्य वाटत नाही . किंबहूना तीला ह्याचीच अपेक्षा असते .

प्रेम नावाचा म्हातारा त्यांचे शंका निरसन करतो . तो म्हणतो की जर तुम्ही यश किंवा संपत्ति या म्हाता–यांना बोलावले असते तर ते एकएकटेच आले असते . पण तुम्ही ( मला ) प्रेमाला बोलावलेत त्यामुळे हे पण दोघे आले .

काय मित्रांनो काही अर्थबोध होतोय का ? त्या म्हाता–याने किती छान संदेश दिला आपल्याला .

आज आपण सर्वजणच यशाच्या मागे धावत असतो . एक गोष्ट मिळाली की दुस–याचा हव्यास चालू होतो . दुस–याने मिळविलेली गोष्ट किंवा त्याचे यश मिळविण्यात जास्तच रस असतो . यशाशिवाय आपण जगूच शकत नाही . अशी आपली अवस्था होते . लहान लहान पराभव किंवा कमी यश सुद्धा आपल्याला वेडेपिसे करते . जीवनातील रस कमी झाल्याची भावना होते . ईश्र्वरनिष्ठा डळमळायला लागते . शेवटी किती यश मिळेल हे आपल्या गुणांवर व पूर्वसुकृतावर अवलंबून असते . नशीबाची साथ नसेल तर मनातील प्रत्येक गोष्ट साध्य होईलच असे नाही . आपण असे म्हणूया की आपल्याला पाहिजे असेल ते मिळाले की आपण यशस्वी झालो असे वाटते .

**To get what you want is success.**

यश मिळविता मिळविता आपण संपत्ति पण मिळवितो . यशाप्रमाणेच संपत्तिचा पण हव्यास सुरू होतो . जस जसा माणूस यश आणि संपत्तिच्या आहारी जातो तसा त्याच्या स्वभावात , वागणुकीत बदल होऊ लागतो . त्याची मते , नैतिकतेच्या कल्पना , सैल होऊ लागतात . माणसामाणसातील संवाद बेसूर होऊ लागतो . जिव्हाळा , प्रेम सारख्या कोमल भावनांची जागा अहंकार , राग , मत्सर घेऊ लागतात व कालांतराने जीवनाचा तोल ढळू लागतो . आयुष्य म्हणजे एक व्यवहार वाटतो . जेव्हा माणसाला जाग येते तेव्हा उशीर झालेला असतो .

त्यामुळेच सर्वात महत्वाचे असते प्रेम . मला शारीरीक प्रेम अभिप्रेत नाही . तर माणुसकीवरील प्रेम , समाजावर प्रेम , देशावर प्रेम , व्यवसायावर प्रेम अभिप्रेत आहे . प्रेमात अशी ताकद आहे की ती माणसाला त्याच्या आदर्श वादापासून भरकटू देत नाही . हे प्रेमच नम्रता शिकवते . त्यामुळेच प्रेम असेल तर यश व संपत्ति मिळणारच असते . हे प्रेमच माणसाला कठीण दिवसात , गरीबीत साथ देते व संकटाचा सामना करायला प्रेरणा देते .

काय मित्रांनो आपल्या ‘ प्रेमाचा’ मीटर काय दाखवितोय ? लक्षात ठेवा **To Love what you get is happiness.**